**बृहन्मुंबई महानगरपालिका**

सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक

क्रमांक एमओएम/५५ दिनांक ०८.०४.२०२५

विषय - न्यायप्रविष्ट प्रकरणात शासन/मंत्री महोदय तसेच इतर शासकीय संस्था यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्रव्यवहारावर करावयाच्या कार्यवाहीबाबत अवलंबवयाची मार्गदर्शक तत्वे/स्थायी मार्गदर्शक तत्वे (SOP) याबाबत.

संदर्भ — Writ Petition No.2804 of 2023 The Pentecostal Mission Society & Others V/s. Municipal Corporation of Greater Mumbai & Others along with Interim Application (L) No.9497 of 2024 & Interim Application (L) No.18723 of 2023 in Writ Petition No.2704 of 2023 या प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.24.10.2024 रोजी पारीत केलेले आदेश.

बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधित वेगवेगळी निवेदने नागरिक, स्वयंसेवी संस्था तसेच इतर स्थानिक संस्था मा.मुख्यमंत्री/मा.मंत्री महोदय इत्यादींच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनास सादर करीत असतात. मा.मुख्यमंत्री/मा.मंत्री महोदय यांच्या निर्देशासह उक्त निवेदने बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त होत असतात. अशी निवेदने संबंधित खाते/विभागास प्राप्त झाल्यानंतर मा.मुख्यमंत्री/मा.मंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्राप्त निवेदनांवर नियमानुसार उचित कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल/पत्रोत्तर संबंधित लोकप्रतिनिधी अथवा शासनास पाठविणे आवश्यक आहे. परंतु याबाबत सबंधित खाते/विभागांकडून विहित वेळेत कार्यवाही होत नसल्याचे प्रशासनास आढळून आले आहे. अशाच एका प्रकरणी, संदर्भित न्यायालयीन आदेशान्वये मा.न्यायालयाने मा.मुख्यमंत्र्यांचे निर्देशानुसार विहित वेळेत प्रस्ताव न पाठविल्याबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेवर ताशेरे ओढले आहेत.

सदर बाब गंभीर स्वरुपाची असून अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता सर्व खाते/विभाग प्रमुख यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

(१) मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री महोदयांकडून प्राप्त होणा-या निवेदनांची प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र नोंद घेण्यात यावी.

(२) अशा प्राप्त होणा-या निवेदनांवर नियमानुसार उचित कार्यवाही त्वरेने करुन त्याबाबतचा अहवाल/पत्रोत्तर मा.मुख्यमंत्री /मा.मंत्री महोदयांकडे अथवा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठविण्यात यावा.

(३) सर्व कार्यालय प्रमुख यांनी मा.मुख्यमंत्री/मा.मंत्री महोदयांकडून प्राप्त होणा-या निवेदनांचा वेळोवेळी आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल/पत्रोत्तर सक्षम प्राधिका-यांची मंजुरी प्राप्त करुन विहित वेळेत पाठविले जातील याची दक्षता घ्यावी.

सर्व खाते/विभाग प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/-११.०३.२०२५ | सही/-१३.०३.२०२५ | सही/-२६.०३.२०२५ | सही/-०२.०४.२०२५ |
| (शारदा गोसावी) | (किशोर गांधी) | (डॉ.अश्विनी जोशी) | (भूषण गगराणी) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अति.महानगरपालिका आयुक्त (शहर) | महानगरपालिका आयुक्त |

प्रकअ/१६६

२०२४-२५

सामान्य प्रशासन विभाग

क्र.एमओएम/५५ दि.०८.०४.२०२५

प्रत:------------------------------------------------------------------------------------------यांना

माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(श्रीम.लीना ता. शिंदे)

रचना व कार्यपध्दती अधिकारी (आयुक्त कार्यालय)